
ISSN 2394-5303

International Multilingual Research Journal

# Printing Area

Special Issue December 2017



Maratha Vidya Prasarak Samaj's

## Smt.Vimblaben Khimji Tejookaya

## ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE,

Deolali Camp, Nashik-422 401

NAAC Re-accredited 'A' Grade

**TWO DAY NATIONAL LEVEL SEMINAR**

ON

## "GOODS AND SERVICES TAX (GST) THE CONSUMER ISSUES AND CHALLENGES IN COMMERCE & ECONOMICS"

Sponsord By

**BCUD,**

Savitribai Phule Pune University, Pune

Organized by

**Department of Commerce & Economics**

**Dr.S.K.Pagar**
Co-ordinator

**Dr.V.J.Medhane**
Principal

ISSN 2394-5303

Jr. No. 43053 UGC Approved Refereed Journal

International Multilingual Research Journal

**Special Issue :** Goods and Service Tax (GST) the Consumer issues and Challenges in Commerce & Economics

**Bapuji Gholap : Chief Editor**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**At Post Limbaganesh, Tq.Dist. Beed-431 126**

## Editorial Board

- Dr. Vijay J. Medhane — Editor in Chief
- Dr. S. K. Pagar — Executive Editor
- Prof. V. B. Saidpatil — Co-Editor

## Editorial Committee

- Prof. S. L. Bhoj
- Dr. Smt. L. D. Jadhav
- Dr. Urmila Y. Gite
- Dr. S. Y. Malode
- Dr. D. G. Ushir
- Prof. D. R. Patade

## Advisory Committee

- Dr. Vijay J. Medhane
- Dr. V. B. Gaikwad
- Dr. D. D. Kajale
- Dr. S. K. Pagar
- Prof. V. B. Saidpatil
- Dr. Dilip B. Shinde
- Dr. R. D. Darekar
- Dr. D. R. Bacchav
- Prof. T. B. Khalkar
- Dr. S. R. Nikam
- Dr. R. K. Datir
- Dr. Suhas Avhad

| Sr. No. | Topic | Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 27 | वस्तू व सेवाकर : जीएसटी एक अभ्यास | प्रा.जी.सी.वर्वे<br>प्रा.डॉ.पंकज त्र्यंबक निकम | 112 |
| 28 | Need of GST | Dr.Jayashri P. Jadhav | 115 |
| 29 | Impact of GST on Trade | Mrs.Anita B. Derle | 118 |
| 30 | Impact of GST on Retail Sector in India | Mr.R.K.Binniwale | 122 |
| 31 | GST Impact on Education Sector in India | Smt. Patil Sangita | 125 |
| 32 | Impact of GST Bill on Different Sectors in India | Prof. Smt. Gaikwad Shakuntala K. | 127 |
| 33 | जीएसटीची गरज | प्रा.रंजना व्ही. जाधव | 132 |
| 34 | India's Goods & Service Tax : Comparison with Developed and Emerging Market Countries | Dr.Nitin D. Ade | 137 |
| 35 | Implementation of GST in India : It's Benefits and Impact on Various Industries in India | Bhavini K. Patel | 143 |
| 36 | Impacts of Goods and Service Tax (GST) on Trade | Prof.A.L. Gaikwad | 149 |
| 37 | Need for Goods and Services Tax (GST) in India | Prof.Chhaya K. Labhade | 153 |
| 38 | GST and Its Impact on the Consumer | Komal Narayan Phadol | 156 |
| 39 | Challenges and Limitations of GST | Nitin Narayan Phadol | 159 |
| 40 | जी.एस.टी. एक कर : एक बाजारपेठ | प्रा.श्रीमती अश्विनी पी. निसाळ | 162 |

# वस्तु व सेवा कर–जीएसटी : एक अभ्यास

प्रा. जी.सी. बर्वे
वणिज्य विभाग,
म.वि.प्र.चे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, मनमाड, ता. नांदगांव,
जि. नाशिक

प्रा.डॉ. पंकज त्र्यंबक निकम
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
म.वि.प्र.चे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, मनमाड, ता. नांदगांव,
जि. नाशिक

**प्रस्तावना:–**

भारतात प्रामुख्याने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांची आकारणी केली जाते. सरकारला उत्पन्न मिळवून देणाऱ्या साधनांत अप्रत्यक्ष करांचा वाटा नेहमीच अधिक राहिला आहे. सरकारच्या खर्चात जसजशी वाढ होत गेली तसतसे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी अप्रत्यक्ष करांच्या रचनेत सातत्याने बदल करण्यात आला आहे. परंतु तरी देखील कर चुकवेगिरीला आळा बसला नाही. त्याच पार्श्वभूमीवर देशातील अप्रत्यक्ष कर कमी करून त्याऐवजी एकच सर्वसमावेशक कर प्रणाली आणावी असा प्रस्ताव पुढे आला. तो म्हणजेच वस्तु व सेवा कर –जीएसटी होय. सन १९५४ मध्ये जगातील फ्रान्स या देशात जीएसटीची प्रथम अंमलबजावणी करण्यात आली. सध्या जगातील १६० देशांनी जीएसटीची अंमलबजावणी केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात मोठी कर सुधारणा म्हणून ओळखली जाणारी वस्तु व सेवा कर प्रणाली भारतात १ जुलै २०१७ पासुन अंमलात आलेली असून यामध्ये एकूण १२०० वस्तु व ५०० सेवा समाविष्ट केलेल्या आहेत.

**अभ्यासाची उद्दीष्टये :–**

१) जीएसटीचे स्वरूप अभ्यासणे
२) जीएसटीचे वैशिष्टये अभ्यासणे
३) जीएसटीची प्रक्रिया अभ्यासणे
४) जीएसटीचे फायदे–तोटे अभ्यासणे

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी दुय्यम तथ्यांचा आधार घेतलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने दैनिक वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, वेबसाईट्स इत्यांदीचा वापर करण्यात आलेला आहे.

**वस्तु व सेवा कराचे स्वरूप:–**

वस्तु व सेवा कर हा एक अप्रत्यक्ष कर असून तो उत्पादन, विक्री व वापर यावरील देशपातळीवरील एकच सर्व समावेशक असा कर आहे. तो मध्यवर्ती उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, सेवा कर, मुल्यवर्धित कर, केंद्रीय विक्री कर, या अप्रत्यक्ष करांऐवजी आकारण्यास सुरूवात झाली आहे. थोडक्यात केंद्र व राज्यपातळीवर पुर्वी जे अनेक अप्रत्यक्ष कर आकारले जात होते ते सर्व कर रद्द करून त्याऐवजी वस्तु व सेवा कर आकारण्यास सुरूवात झाली आहे. वस्तु व सेवा कराची तीन भागात विभागणी करण्यात आली आहे.

१) केंद्रीय वस्तु व सेवा कर– सीजीएसटी

२) राज्य वस्तु व सेवा कर– एसजीएसटी

३) आंतरराज्य वस्तु व सेवा कर– आयजीएसटी

अत्यावश्यक वस्तु व सेवा करमुक्त म्हणजे शुन्य टक्के करण्यात आल्या आहेत. नेहमीच्या आवश्यक वस्तु व सेवांसाठी सवलतीचा दर ५ टक्के, १८ टक्के असे प्रमाणित दर निश्चित करण्यात आले आहेत. साधारणपणे सुखकारक, चैनीच्या वस्तु व सेवांसाठी २८टक्के दराने कर आकारण्याचे निश्चित केले आहे आणीबाणीच्या परिस्थितीत, अपवादात्मक गरजेच्या काळात हा दर ४० टक्के पर्यंत वाढविण्याची मुळ कायद्यात तरतुद करण्यात आली आहे. १ जुलै २०१७ पासून जीएसटी लागू झाला. या कायद्यातंर्गत करपात्र व्यक्तींनी/ संस्थांनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

**जीएसटीचे वैशिष्टये :–**

१) वस्तु व सेवा कर हा वस्तु व सेवांच्या सर्व विनिमयावर लागु असणार आहे.

२) केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या खात्यावर करदाता एकाच वेळी हा कर भरू शकेल.

३) सर्व व्यवहारांसाठी आदान कर परिपूर्ती लागू असेल.

४) सर्व वस्तु व सेवा विनिमयावर एकाचवेळी केंद्र सरकार व राज्य सरकार जीएसटी आकारू शकतात.

५) प्रत्येक करदात्याला पॅन संलग्न टॅक्स पेयर आयडेंटीफिकेशन नंबर (टीन) दिला जाणार आहे.

६) करदात्यांना कर भरणा कारण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांना समान फॉर्ममध्येच, ठराविक काळाने कर प्रपत्र भरावे लागणार आहे.

७) वस्तु व सेवा कर राष्ट्रीय पातळीवर सार्वत्रिक एकजिनसी असा आहे.

८) या कर व्यवस्थेत कर चुकवेगीरी कमीत कमी असेल तसेच कर चुकविणाऱ्यांची आपोआप प्रसिद्धी व काळी यादी प्रसिध्द होण्याची सोय या व्यवस्थेत आहे.

९) वस्तु व सेवा कराची दर रचना पुरोगामी बहुस्तरीय आहे. अत्यावश्यक वस्तु व सेवा या करापासून मुक्त आहेत.

१०) वस्तु व सेवा कर पुर्णत: मुल्याधारित आहे.

११) वस्तु व सेवा कराची वसूली व्यवहाराच्या पातळीलाच म्हणजेच टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स अशी आहे.

१२) वस्तु व सेवा कर स्विकारल्यामुळे कर महसुल घटल्यास केंद्र सरकार घटक राज्यांना वार्षिक १४ टक्के वृद्धीकर गृहित धरून पहिली ५ वर्षे घटत्या प्रमाणात नुकसान भरपाई देणार आहे.

**जीएसटीची प्रक्रिया :–**

जीएसटीची प्रक्रिया समजण्यासाठी पुढील तीन वर्ग लक्षात घेणे आवश्यक आहे.

**१) वर्ग पहिला–**

जीएसटी नोंदणी घेणे ज्यांच्यासाठी सक्तीचे आहे त्या व्यक्तींनी किंवा व्यावसायिकांनी इतर कोणत्याही निकषांचा विचार न करता नोंदणी घेणे कायद्यानुसार सक्तीचे आहे. यामध्ये प्रामुख्याने सेवा

किंवा वस्तु पुरविणारे, नैमित्तीक व्यावसायिक, अनिवासी व्यावसायिक, ई–प्रत्यावर्ती कर भरावे लागणारे लोक, ईकॉमर्स पुरवठा करणारे, ई–कॉमर्स संचालक इ. गटातील लोकांनी व्यवसायाच्या सुरुवातीपासून नोंदणी घेणे आवश्यक आहे.

**२) वर्ग दुसरा–**

वर्ग एक मध्ये उल्लेख केल्या व्यतिरिक्त असणारे व्यावसायिक यांनी त्यांची देशातील एकूण करपात्र व करपात्र नसलेल्या वस्तु व सेवांच्या पुरवठयांची उलाढाल २० लाख रूपये होताच ३० दिवसांच्या आत नोंदणी दाखला घेणे अनिवार्य आहे. यांचा दुसऱ्या वर्गात समावेश होतो.

**३) वर्ग तिसरा –**

जे व्यावसायिक पहिल्या वर्गात येत नाहीत व ज्यांची उलाढाल २० लाख रूपयांच्या आत आहे. परंतु जे व्यावसायिक ऐच्छिक रित्या जीएसटीमध्ये नोंदणीकृत होऊ शकतात यांचा यामध्ये समावेश होतो. असे सर्व नोंदणीस पात्र असणारे व ऐच्छिक नोंदणी घेणारे यांना जीएसटीच्या वेबसाईटवर जावून नोंदणी घेण्याची प्रक्रिया ऑनलाईन पूर्ण करता येते. अशा सर्व व्यावसायिकांना किंवा व्यक्तिंना त्यांच्या व्यवसायाच्या जितक्या राज्यात शाखा असतील तितक्या राज्यात नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

**जीएसटीचे फायदे:–**

१) करपद्धतीत सुसूत्रता निर्माण झाली आहे. कारण देशभरात वस्तु व सेवांवर समान कर आकारणी होत आहे.

२) वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे देशभरात वस्तु व सेवांच्या किंमती एकसारख्या राहणार आहेत.

३) कर आकारणीत एक वाक्यता असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन गुंतवणूकीला चालना मिळणार आहे.

४) वस्तु व सेवाकर आकारणीमुळे करांचा बोजा कमी होऊन वस्तु व सेवांच्या किंमती आपोआप कमी होत आहेत. त्यामुळे ग्राहकांची खरेदीशक्ती वाढत आहे.

५) करांचे जाळे अधिक विस्तृत होत आहे.

६) करदात्यांची संख्या वाढत आहे. तसेच सरकारच्या उत्पन्नात वाढ होत आहे.

७) आर्थिक विकासाचा वेग वाढणार आहे.

८) कर वसुलीचा खर्च कमी होणार आहे.

९) उत्पादकांच्या दृष्टीने ही व्यवस्था अधिक सोपी आहे. त्यांना आता वेगवेगळ्या विभागांमध्ये कर भरण्यासाठी आवेदनपत्र सादर करावे लागणार नाही.

१०) खरेदी विक्री व्यवहारांची नोंद ऑनलाईन असल्यामुळे कर चुकवेगिरीला आळा बसणार आहे.

**जीएसटीचे तोटे :–**

१) केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे जवळपास २० अप्रत्यक्ष कर नाहिसे झाले आहेत.

२) जीएसटी कार्यप्रणालीबाबत व्यापाऱ्यांना पुरेशी माहिती नाही.

ISSN No.2394-5303

३) जीएसटीचा महत्तम दर २८ टक्के आहे. त्यामुळे चैनीच्या व ऐशोआरामी वस्तू व सेवांच्या किंमती वाढणार आहेत.

४) ग्रामीण भागातील बहुतांश व्यापारी वर्ग निरक्षर व संगणकाचे ज्ञान नसलेला आहे. त्यामुळे व्यवहारांची ऑनलाईन नोंदी करण्यात अडचणी येत आहेत.

५) राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांना महसुलासाठी केंद्र सरकारवर अवलंबुन राहावे लागणार आहे.

६) कर आकारणी आणि कर भरणा प्रक्रियांमध्ये अनेक अडथळे व समस्या येण्याची शक्यता आहे, व सध्या तसे चित्र दिसून येत आहे.

सारांश:–

केंद्र सरकारकडून पुर्वी आकारल्या जाणाऱ्या विविध अप्रत्यक्ष कराऐवजी जीएसटी या नवीन करप्रणालीमुळे एखाद्या विशिष्ट प्रकारच्या वस्तूवर संपुर्ण देशभर एकच कर दर आकारला जात आहे. निश्चितच ही नविन कर प्रणाली गुंतवणूक वाढीसाठी पोषक आहे. त्याबरोबरच जीएसटीमुळे सरकारच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. देशात करदात्यांचे जाळे अधिक व्यापण्यास तसेच आर्थिक विकासास सहाय्यक ठरणारी ही प्रणाली आहे. व्यापाऱ्यांच्या खरेदीविक्रीच्या सर्व व्यवहारांची नोंद ऑनलाईन असल्यामुळे अधिक उत्पन्न व कमी खर्चाची ही करप्रणाली आहे. परंतु दुसऱ्या बाजुने विचार केल्यास या कर प्रणालीची पुरेशी माहिती व संगणकाचे ज्ञान व्यापाऱ्यांना नसल्यामुळे अंमल बजावणीत अनेक अडचणी येत आहेत. जीएसटीची माहिती पुरविणारी यंत्रणा अपुरी पडत आहे. असे असले तरीही कर रचनेतील हा बदल देशाच्या अर्थव्यवस्थेस बळ देणारा आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

संदर्भ :–

१) सातभाई दिलीप, वस्तु व सेवा कराची ओळख, वस्तु व सेवा कर (GST), २०१७
२) यादव संतोषकुमार, वस्तु आणि सेवा कर– दुसऱ्या अर्थक्रांतीच्या दिशेने! प्रबोधन प्रकाशन ज्योती, जानेवारी २०१७.
३) दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक पुढारी इ. वर्तमानपत्रे
४) देसले किरण(२०१५), स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग–१, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव
५) https//en.wikipedia.org/wiki/Goods-and services-Tax-(India).